# कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ७२ /२०२५ दि. १२/०४/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १३/०४/२०२५ रोजी सायंकाळी १९:३० वा. कल्याण पुर्व "ड" प्रभाग क्षेत्र कार्यालयाचे परिक्षेत्रात विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज सेंटर लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक १४/०४/२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती च्या अनुषंगाने मिरवणुका निघणार असुन सदर मिरवणुका जुना पुना लिंकरोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक "ड" वॉर्ड, कल्याण डोंबिवली मनपा कार्यालय, कल्याण पुर्व येथे समाप्त होणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**नो पार्कींग –** कल्याण पूर्व 'ड' वॉर्ड समोर जुना पुणा लिंक रोडवर रस्त्याचे दुतर्फा दोन्हीही बाजुस ५०० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन करण्यात येत आहे.

**नो पार्कींग –** पुना लिंक रोड वरून नूतन ज्ञानमंदीर शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे दुतर्फा ३०० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन करण्यात येत आहे.

**नो पार्कींग –** पुना लिंक रोडवरून राय रेसिडेंन्सी ऑफिस कडे जाणाऱ्या रस्त्याचे दुतर्फा ३०० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दि. १३/०४/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ ते दिनांक १४/०४/२०२५ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

CamScanner

ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

CS CamScanner